आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२८ मार्च २०२६ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- गेल्या ११ वर्षांत पायाभूत सुविधांवरच्या अर्थसंकल्पीय तरतुदींमध्ये सहापट वाढ झाल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- होर्मुझच्या सामुद्रधुनीतून मानवतवादी मदत, सुलभतेनं आणि वेगानं पोहोचवण्यासाठी  इराणची सहमती

- नेपाळमधे माजी प्रधानमंत्री आणि गृहमंत्र्यांना अटक

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेला आजपासून प्रारंभ

**आणि**

- मन की बात कार्यक्रमात उद्या प्रधानमंत्री देशवासियांशी संवाद साधणार

**<><><><><>**

विकसित भारताच्या निर्माणासाठी अत्याधुनिक पायाभूत सुविधांमध्ये केंद्र सरकार मोठी गुंतवणूक करत असून गेल्या ११ वर्षांत पायाभूत सुविधांवरच्या अर्थसंकल्पीय तरतुदींमध्ये सहापट वाढ केली आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. उत्तर प्रदेशातल्या गौतम बुद्ध नगर जिल्ह्यातल्या जेवर इथं नॉयडा आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचं उद्घाटन प्रधानमंत्र्यांनी केलं, त्यावेळी ते बोलत हो◌ेते. महामार्ग आणि एक्सप्रेसवेंवर सुमारे १७ लाख कोटी रुपये खर्च केले. देशभरात एक लाख किलोमीटर महामार्ग जाळं विणण्यात आलं. जवळपास १०० टक्के ब्रॉडगेज नेटवर्कचं विद्युतीकरण झालं आहे, असं प्रधानमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

भारत आपल्या नागरिकांच्या सामर्थ्यामुळे पूर्ण ताकदीनं पश्चिम आशियातल्या युद्धसंकटाचा सामना करत आहे असंही मोदी म्हणाले…

**(होल्ड बाईट प्रधानमंत्री)**

नॉयडा आंतरराष्ट्रीय विमानतळ सुमारे ११ हजार २०० कोटी रुपये खर्चून बांधण्यात येणार असून हा देशातल्या सर्वात मोठ्या ग्रीनफील्ड विमानतळ प्रकल्पांपैकी एक आहे. पहिल्या टप्प्यात विमानतळाची दरवर्षी सुमारे १ कोटी २० लाख प्रवाशांची क्षमता असेल. ती भविष्यात सुमारे ७ कोटी वार्षिक प्रवाशांपर्यंत वाढू शकेल.

**<><><><><>**

होर्मुझच्या सामुद्रधुनीतून मानवतवादी मदत सुलभतेनं आणि वेगानं पोहोचवण्यासाठी इराणनं सहमती दर्शवली आहे. जागतिक पुरवठा साखळीत ही सामुद्रधुनी  महत्त्वाचा मार्ग असून तिथं मानवतावादी मदत आणि कृषी मालाची वाहतूक करू देण्याची संयुक्त राष्ट्रांची विनंती तेहराननं स्वीकारली आहे. संयुक्त राष्ट्रांमधे इराणचे राजदूत अली बहरेनी यांनी ही माहिती दिली.  इराणच्या अणुउर्जा प्रकल्पांवर हल्ले होत असतानाही ही विनंती मान्य केल्याचं त्यांनी सांगितलं.

दरम्यान भारताची दोन तेलवाहू जहाजं आज होर्मुझची सामुद्रधुनी पार करणार आहेत. भारतीय नौदलाच्या युद्धनौका त्यांच्या रक्षणासाठी तैनात करण्यात आल्या आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सौदी अरेबियाचे युवराज आणि प्रधानमंत्री, प्रिन्स मोहम्मद बिन सलमान यांच्याशी संवाद साधला आणि पश्चिम आशियातील सुरू असलेल्या संघर्षावर चर्चा केली. समुद्री मार्गाने प्रवासाच्या स्वातंत्र्याची हमी आणि सागरी मार्ग खुले आणि सुरक्षित ठेवण्याच्या गरजेवर दोन्ही नेत्यांमध्ये सहमती झाली. भारताप्रमाणे सौदी अरेबियानेही प्रादेशिक ऊर्जा सुविधांवरील हल्ल्यांचा निषेध केल्याची माहिती प्रधानमंत्री मोदी यांनी समाजमाध्यमातल्या पोस्टद्वारे दिली. सौदी अरेबियातील भारतीय समुदायाच्या कल्याणासाठी सलमान यांनी दिलेल्या पाठिंब्याबद्दल मोदींनी त्यांचे आभार मानले.

<><><><><>

युद्धपरिस्थितीच्या परिणामांपासून देशवासियांचं रक्षण करण्यास भारत बांधिल आहे, अशी ग्वाही संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज दिली. नवी दिल्लीत अनेक वरिष्ठ मंत्र्यांचा समावेश असलेल्या एका अनौपचारिक मंत्रीगटाच्या बैठकीचं अध्यक्षस्थान भूषवताना सिंह यांनी हे विधान केलं. पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर ऊर्जा पुरवठ्यास असलेले धोके, जीवनावश्यक वस्तूंची देशांतर्गत उपलब्धता आदी विषयांचा आढावा घेण्यासाठी या बैठकीचं आयोजन करण्यात आलं होतं. सरकार राबवत असलेल्या सर्व उपाययोजनांवर या बैठकीत सखोल चर्चा झाली, अशी माहिती राजनाथ सिंह यांनी समाजमाध्यमांद्वारे दिली.

<><><><><>

महाराष्ट्र राज्य मुख्यमंत्री कार्यालयामार्फत आयोजित '१५० दिवस ई-गव्हर्नन्स' या विशेष कार्यक्रमात ठाणे ग्रामीण पोलीस दलानं संपूर्ण राज्यात सर्वोत्कृष्ट पोलीस अधीक्षक कार्यालय आणि जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयाने उल्लेखनीय कामगिरी करत राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. राज्यातल्या सर्व शासकीय विभागांच्या कामकाजात पारदर्शकता आणि वेग आणण्यासाठी ही स्पर्धा आयोजित केली होती. ई गव्हर्नन्स सुधारणा तसंच सेवाकर्मी कार्यक्रमाअंतर्गत उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या जिल्हा प्रशासकीय अधिकाऱ्यांचाही मुख्यमंत्र्यांनी प्रशस्तीपत्र देऊन सन्मान केला. माहिती तंत्रज्ञान तथा सांस्कृतिक कार्यमंत्री अशिष शेलार, राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल उपस्थित होते. भारतीय गुणवत्ता परिषद यांच्या मार्फत राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांचे सात सर्वसमावेशक निकषांवर मूल्यमापन करण्यात आले होते.

<><><><><>

नेपाळचे माजी प्रधानमंत्री ‘केपी शर्मा ओली’ आणि माजी गृहमंत्री ‘रमेश लेखक’ यांना आज सकाळी अटक करण्यात आली. गेल्या वर्षी नेपाळमधे तत्कालीन सरकारविरोधातल्या निदर्शनांवरच्या कारवाईमधे अनेक तरुण निदर्शकांचा मृत्यू झाला होता. त्यासंदर्भात नेमलेल्या चौकशी समितीने ओली आणि लेखक यांना जबाबदार धरलं आहे. नेपाळचे नवनिर्वाचित प्रधानमंत्री  बालेंद्र शाह यांच्या अध्यक्षतेखाली काल काठमांडू इथं झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत  या समितीचा अहवाल स्वीकारण्यात आला. ओली आणि लेखक या दोघांनाही उद्या न्यायालयात हजर केलं जाईल.

दरम्यान, या अटकेच्या निषधार्थ सीपीएन यूएमएल  पक्षाच्या कार्यकर्त्यांनी काठमांडू इथल्या बाबर महल इथल्या जिल्हा न्यायालयासमोर निदर्शनं सुरु केली. सीपीएन-यूएमएल समर्थकांच्या अनेक जनसंघटांनांनी मैतीघर मंडळापासून निषेध मोर्चा काढला. पोलिसांनी त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केला तेव्हा आंदोलक आणि पोलिसांमध्ये चकमक झाली. आंदोलकांनी यावेळी जोरदार घोषणाबाजी केली.

**<><><><><>**

एक एप्रिलपासून रशिया शुद्ध पेट्रोलची निर्यात बंद करणार आहे.  रशियाचे उपप्रधानमंत्री अलेक्झांडर नोवॅक यांनी उर्जा मंत्रालयाला तसा ठराव करण्याचे आदेश दिले आहेत. कच्च्या तेलाची निर्यात मात्र विनाअडथळा सुरू राहील असं रशियानं स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

रशियानं काल रात्रभर युक्रेनवर २७० ड्रोननं चढवलेल्या हल्ल्यात पाचजण ठार झाले आहेत. नागरिकांमध्ये  दहशत पसरवण्यासाठी केलेला हा हल्ला होता असा आरोप युक्रेननं केला आहे.

दुबईत अमेरिकेच्या छुप्या लष्करी तळावर आज इराणनं हल्ला चढवल्याचं इराणनं सांगितलं. तिथं अमेरिकेच्या ५०० तुकड्या तैनात असल्याचा दावा इराणनं

केला आहे. आयआरजीसी अर्थात इस्लामिक रिव्हॉल्युशनरी गार्ड क्रॉप्सनं हा क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ला केल्याचं म्हटलं आहे. अमेरिकेनं अजून तरी या वृत्ताला दुजोरा दिलेला नाही.

पश्चिम आशियातला संघर्ष आता अधिक तीव्र झाला असून यात येमेनच्या हुथी बंडखोरांनी आज पहाटे इस्त्रायलच्या दिशेनं पहिलं क्षेपणास्त्र डागलं. इस्त्रायलनं लेबाननची राजधानी बैरूत आणि दक्षिण भागात हिजबुल्लाच्या तळांवर केलेल्या हल्ल्यात अनेक नागरिक ठार झाले.

**<><><><><>**

इराण युद्ध संपल्यानंतर सौदी अरेबिया आणि इस्त्राईल या दोन्ही देशांनी परस्परांमधले संबंध सुरळीत करण्याची गरज आहे, असं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. मायामी इथल्या एका कार्यक्रमात ते बोलत होते. ट्रम्प त्यांच्या ‘अब्राहम करारा अंतर्गत’ या दोन्ही शक्तिशाली देशांवर संबंध सुधारण्यासाठी गेली अनेक वर्षं दबाव आणत आहेत.

**<><><><><>**

विजेवर चालणाऱ्या वाहनांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूनं आणलेल्या पी एम ई ड्राईव्ह योजनेच्या निकषांमधे केंद्रसरकारने बदल केला आहे. आता ३१ जुलै २०२६ पर्यंत नोंदणी झालेल्या दुचाकी आणि ३१ मार्च पर्यंत नोंदणी झालेल्या इलेक्ट्रिक रिक्षा आणि ढकलगाड्यांना ‘ही’ प्रोत्साहनपर सूट मिळेल. प्रोत्साहन मिळण्यासाठी दुचाकींची कमाल किंमत मर्यादा दीड लाख रुपये तर रिक्षांची कमाल किंमत मर्यादा अडीच लाख इतकी ठेवण्यात आली आहे.

**<><><><><>**

१९ वी इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा आजपासून सुरुवात झाली. बंगळुरू इथं एम. चिन्नास्वामी मैदानावर 'सनरायझर्स हैदराबाद' आणि गतविजेते 'रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू' या संघांमध्ये सामना सुरू आहे.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा सनरायजर्स हैदराबादच्या **६** षटकात **तीन** बाद **४९** धावा झाल्या होत्या.

मुंबईच्या वानखेडे मैदानावर उद्या मुंबई इंडियन्स विरुद्ध कोलकाता नाईट रायडर्स यांची लढत होईल.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या, आकाशवाणीवरच्या ‘मन की बात’ या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १३२ वा भाग असेल. सकाळी ११ वाजता प्रसारित होणारा हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या, तसंच न्यूज ऑन ए आय आर ॲप वरुन ऐकता येईल.

//<><><><><>//